# देहुरोड पोलीस स्टेशन
# पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय
**पत्ताः-जुना पुणे-मुंबई हायवे, सेंट्रलचौक, देहुरोड, पुणे.**
**फोन नं.०२०-२७६७१२८८**
**ई-मेल आयडी-psdehuroad.pcpc-mh@gov.in**


**प्रेसनोट दिनांक-०५/०७/२०२४**

## वाहनचोरी करणारे देहुरोड पोलीसांकडुन अटक एकुण ०६ गुन्हे उघडकीस

देहुरोड पोलीस स्टेशन हद्दीमध्ये वाहन चोरीच्या घटनेच्या अनुषंगाने वाहन चोरीस प्रतिबंधघालण्याचे आदेश मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी-चिंचवड यांनी दिले होते. त्यानअनुषंगाने देहुरोड पोलीस तपास पथकाला काही मुले चोरीचे दुचाकी मोटार सायकल विक्रीकरीता काळोखे चौक, विठ्ठलवाडी देहूगांव, पुणे येथे येणार आहे अशी बातमी मिळाली बातमीच्या अनुषंगाने सदर ठिकाणी सापळा लावला असता बातमी प्रमाणे दोन मोटार सायकलवरुन आलेले १) रोहीत विशाल सकटे, वय २२ वर्षे, रा. माळवाडी, हनुमान मंदीराच्या बाजुला, देहूगांव, पुणे मोनं. ७०३८५७७५९२, (२) युवराज शरद जाधव, वय १७ वर्षे, रा. देहूफाटा शिंदेवस्ती, तळेगांव चाकण रोड, सुदवडी, ता. खेड, जि. पुणे ३) रोहित विठ्ठल मादळे, वय १७ वर्षे, रा. मराठी शाळेच्या उजव्या बाजुला विठ्ठलवाडी देहूगांव, पुणे ४) अमर कचरुबा वाघमारे, वय १७ वर्षे, रा. वडाचा मळा, सरस्वती मंगल कार्यालयाच्या बाजुला, काळे यांची घरी भाड्याने, देहूगांव, पुणे यांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे कौशल्यपुर्ण तपास केला असता त्यांच्याकडील दोन्ही मोटार सायकली चोरीच्या असल्याचे निष्पन्न झाले सदर बाबत देहूरोड पोलीस स्टेशन व चिखली पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल होता. आरोपी नामे रोहीत विशाल सकटे याला देहुरोड पोलीस स्टेशन गुरनं. ६८१/२०२३ भा.द.वि.कलम ३७९ गुन्ह्यात अटक करून त्याची पोलीस कोठडी रिमांड मिळवुन अधिक तपास केला असता त्याने त्याचे साथीदारांच्या मदतीने चोरी केलेल्या आणखी ०४ मोटार सायकली हस्तगत केलेल्या आहेत. अद्यापपर्यंत केले तपासात २,४०,०००/- रुपये किंमतीच्या ०६ मोटार सायकली हस्तगत केल्या आहेत.

१) देहुरोड पोलीस स्टेशन गुरनं. ६८१/२०२३ भा.द.वि.कलम ३७९
२) चिखली पो.स्टे.गु.र.नं. २८३/२०२४ भादवि कलम ३७९
३) महाळुंगे पो.स्टे. गु.र.नं. ३५४/२०२४ भादवि कलम ३७९,
४) भोसरी पोलीस स्टेशन गुरनं. ३७०/२०२४ भा.द.वि.कलम ३७९
५)खडकी पोलीस स्टेशन गुरनं. १४६/२०२४ भा.द.वि.कलम ३७९
६)चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन गुरनं. ५२७/२०२३ भा.द.वि.कलम ३७९

येणे प्रमाणे मोटार सायकल चोरीचे एकुण ०६ गुन्हे उघडकीस आलेले असुन देहूरोड पोलीस अधिक तपास करीत आहेत.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त सो, श्री. विनयकुमार चौबे सो, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी सो, मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ–२ बापू बांगर सो, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, देहुरोड विभाग श्री. घेवारे सो. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजय वाघमारे, यांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अजयकुमार राठोड, पोलीस अंमलदार सुनिल यादव, किशोर परदेशी, बाळासाहेब विधाते, बळीराम चव्हाण, प्रशांत माळी, केतन कानगुडे, संतोष महाडीक, निलेश जाधव, मोहसिन आत्तार, युवराज माने, शुभम बावनकर, स्वप्नील साबळे यांनी सदरची उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

**(बापु बांगर)**
**पोलीस उप-आयुक्त,**
**परिमंडळ-२, पिंपरी-चिंचवड.**